

नागरिकांशी भाजपाचा प्रत्यक्ष संवाद

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 05/12/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 287 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# 20 किंवा 22 डिसेंबरला लागणार आचारसंहिता!

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचा दावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी २० किंवा २२ डिसेंबरला आचारसंहिता लागेल, असा दावा भाजप नेते, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केला. इतर पक्षातील शहरातील जे माजी नगरसेवक भाजपमध्ये येऊ इच्छित आहेत.**




त्यांच्या नावावर अगोदर स्थानिक गाभा समितीचे (कोअर कमिटी) एकमत होईल. त्यांचे एकमत झालेली नावे पुढे प्रदेशकडे पाठवली जातील. तशी नावे काढण्याचे काम सुरु असल्याचेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.उमेदवार अर्ज आणि उमेदवारी निश्चितीबाबत चर्चा झाल्याचे सांगून मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, २० किंवा २२ डिसेंबरला महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागेल. आजपासून जो मागेल त्याला उमेदवारी अर्ज दिला जाईल. पुढील चार दिवस उमेदवारी अर्ज भरुन घेतले जातील. अर्ज देण्यासाठी कोणतेही शक्तीप्रदर्शन करायचे नाही. स्वत: इच्छुकाने पक्ष कार्यालयात येऊन अर्ज द्यावा. या अर्जांची छाननी केली जाईल. ते सर्व अर्ज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाठविले जातील.एका खासगी संस्थेच्या माध्यमातून अर्जानुसार प्रत्येकाचा सर्व्हे केला जाईल. सर्व्हेच्या आधारे कोणाचे नाव पुढे आहे, त्यानुसार क्रमांक टाकले जातील. पूर्णपणे सर्व्हेच्या आधारे उमेदवारीचा निर्णय केला जाणार नसून त्याला आधार मानले जाईल. कोण निवडून येईल याबाबतस्थानिक पदाधिकाऱ्यांचे मत घेतले जाईल.

सर्व्हे आणि पदाधिकाऱ्यांचे मत ९० ठिकाणी जुळते. दहा ठिकाणी जुळत नाही. स्थानिक पदाधिकाऱ्यांचे ९० टक्के नावांबाबत एकमत झाले, तर त्यात प्रदेश नेतृत्व कोणताही हस्तक्षेप करणार नाही. प्रदेशकडून अंतिम मान्यता दिली जाईल. उमेदवार निश्चित होताच जाहीर केले जातील, असेही चंद्रकांत पाटील सांगितले.

# मेट्रोचा डीपीआर तयार करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - औद्योगिकनगरी असलेल्या पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून वाहनांच्या संख्येतही भर पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीत भर पडते. त्यासाठी शहरात मेट्रोचे जाळे विस्तारणे गरजेचे आहे. त्यासाठी किवळे- रावेत - डांगे चौक - काळेवाडी - जगताप डेअरी ते चतुर्श्रृंगी असा नवीन मेट्रो मार्ग तयार करावा. त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपी) तयार करावा, अशी मागणी शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.**



**खासदार श्रीरंग बारणे यांचे केंद्रीय मंत्र्यांना साकडे**

खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची दिल्लीत भेट घेतली. पिंपरी-चिंचवड शहरात नवीन मेट्रो मार्गाची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्याबाबतचे सविस्तर निवेदन दिले. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र हे देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या शहरी क्षेत्रांपैकी एक आहेत. जलद शहरीकरणामुळे लोकसंख्या आणि वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण पडत आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची घोषणा केली. सध्या पुण्यात विविध मार्गावर मेट्रोचे काम वेगाने सुरू आहे. काही मार्गावर मेट्रो धावत आहे. त्यामुळे नागरिकांना सुलभ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक वाहतूक सुविधा उपलब्ध होत आहे. पिंपरी-चिंचवड शहरात दापोडी ते पिंपरी या मार्गावर मेट्रो धावत आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार निगडी ते भक्ती शक्ती चौकापर्यंतच्या मेट्रो मार्गाच्या विस्ताराचे काम सुरू झाले आहे. हे पिंपरी-चिंचवड शहरासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. निगडीतून पुण्यापर्यंत नागरिकांना थेट मेट्रोने जाता येईल. पिंपरी-चिंचवडमधील वेगाने वाढणारी लोकसंख्या, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे आणि भविष्यातील वाहतुकीच्या गरजा लक्षात घेता किवळे - रावेत - डांगे चौक - काळेवाडी - जगताप डेअरी व सध्याच्या चतुर्श्रृंगी मेट्रो मेट्रो स्टेशनपर्यंत विस्तार करण्याची आवश्यक आहे. हा संपूर्ण मार्ग औद्योगिक, शैक्षणिक आणि निवासी उद्देशांसाठी महत्त्वाचा आहे. त्यासाठी मेट्रो सेवा आवश्यक आहे.

या विस्तारामुळे परिसराच्या सर्वांगीण विकासाला एक नवीन चालना मिळेल. त्यामुळे या मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यासंबंधी आवश्यक असणारी प्रशासकीय व तांत्रिक कार्यवाही सुरू करावी. हा मार्ग केल्यास पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील वाढत्या वाहतूक समस्यांवर दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय होईल. त्यामुळे याबाबतचा आराखडा करण्यासंदर्भात संबंधितांना निर्देश द्यावेत, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 05/12/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

## पिंपरी चिंचवड करांना अभिमान वाटावे असे क्षण!

# पिंपरी चिंचवड वैभव काव्यसंग्रहाचे प्रकाशन

### संभाजी बारणे यांची संकल्पना, वर्षा उसगावकर यांच्या हस्ते प्रकाशन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड शहरवासीयांना अभिमान वाटावे, असे क्षण म्हणजेच पिंपरी चिंचवड वैभव या काव्यसंग्रहाचे प्रकाशन. पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव परिसरातील सामाजिक कार्यकर्ते तथा कवी लेखक व मनपा वृक्ष प्राधिकरणचे माजी सदस्य संभाजी बारणे यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या एकूण शंभर कवींनी पिंपरी चिंचवड शहरावर केलेल्या कवितांचा संग्रह म्हणजे पिंपरी चिंचवड वैभव या काव्यसंग्रहाचे प्रकाशन महाराष्ट्राची लाडकी हिंदी व मराठी चित्रपटातील ज्येष्ठ अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.**



"पिंपरी चिंचवड वैभव' या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून मांडण्यात आलेला शहराचा पद्यरूप इतिहास ही अतिशय अभिनव संकल्पना आहे!' असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांनी निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर (छोटे सभागृह) प्रेक्षागृह येथे बुधवार, दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोजी काढले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती, पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने 'पिंपरी चिंचवड वैभव' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन करताना वर्षा उसगावकर बोलत होत्या. अखिल भारतीय मराठी महामंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी हे अध्यक्षस्थानी होते;

तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष राजन लाखे, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अभय कुलकर्णी, सनदी लेखापाल प्रा. डॉ. अशोक पगारिया, ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ, माजी नगरसेविका मनीषा पवार, सामाजिक कार्यकर्त्या सुषमा जावळे, कांचन जावळे, आणि पिंपरी-चिंचवड मराठी भाषा संवर्धन समिती सल्लागार संभाजी बारणे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. वर्षा उसगावकर पुढे म्हणाल्या की, 'गायकाचा सूर लागल्यावर जशी मैफल रंगत जाते त्याप्रमाणे नृत्य आणि गायनाने सुरू झालेला हा प्रकाशनसोहळा उत्तरोत्तर रंगतदार होत गेला.

पूर्वी मला कवितांची भीती वाटायची; पण आमच्या एका कौटुंबिक स्नेहाने 'कविता म्हणजे जीवनाचे सत्त्व असते' असे माझ्या मनावर बिंबवल्यावर मला कवितांची गोडी लागली. 'पिंपरी चिंचवड वैभव' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात सहभागी झालेल्या सर्व कवींचे मी अभिनंदन करते!' राजन लाखे यांनी लालित्यपूर्ण शैलीतल्या प्रास्ताविकातून सांगितले की, 'महाराष्ट्र साहित्य परिषदेची पिंपरी-चिंचवड शाखा ही पस्तीस वर्षे जुनी असून दोन वेळा संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट शाखा म्हणून सन्मानित झालेली आहे.

कवितांच्या माध्यमातून पिंपरी - चिंचवड या शहराचा इतिहास शब्दबद्ध व्हावा, अशी संकल्पना संभाजी बारणे यांनी मांडल्यावर आम्ही शहरातील कवींना आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत सुमारे १५२ कवींनी प्रतिसाद दिला; आणि त्यातून निवड करून काव्यसंग्रहासाठी एकूण ९६ कवींच्या कवितांचा समावेश करण्यात आला!' भाऊसाहेब भोईर यांनी मार्मिक शैलीतून, 'विद्येचे माजघर असलेल्या



वर्षा उसगावकर यांचा सन्मान संभाजी बारणे व माजी नगरसेविका मनीषा पवार यांच्या हस्ते करण्यात आला.

पिंपरी-चिंचवड शहरात जागतिक कीर्तीचे मान्यवर येतात, हेच या शहराचे यश आहे!' असे मत व्यक्त केले. डॉ. श्रीपाद जोशी यांनी अध्यक्षीय मनोगतातून, 'भौतिक संसाधनांपेक्षा ऐतिहासिक मूल्यांच्या जपणुकीमध्ये शहराची श्रीमंती ओळखली जाते.

पिंपरी-चिंचवड शहराला भोजापूरच्या रूपाने दोन हजार वर्षांपासूनचा समृद्ध इतिहास लाभला आहे. 'पिंपरी चिंचवड वैभव' हा काव्यसंग्रह शहराचे सांस्कृतिक वैभव आहे!' असे विचार मांडलेज्येष्ठ लेखिका कै. विनीता ऐनापुरेयांनाश्रद्धांजलीवाहण्यातआली .प्रकाशनानंतर प्रा. सुरेखा कटारिया, डॉ. अकिला इनामदार, कमल सोनजे, माधुरी डिसोजा, मंगला पाटसकर, प्रा. सुभाष आहेर, डॉ. नीलकंठ मालाडकर, सीताराम नरके, रमेश पिंजरकर या सहभागी कवींचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. फिरोज मुजावर यांनी नृत्यातून गणेशवंदना सादर केली. सुनीता बोडस, किरण लाखे, नीलिमा फाटक यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखा आणि मराठी भाषा संवर्धन समिती, पिंपरी-चिंचवड यांच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजनात परिश्रम घेतले. गणेश लिंगडे यांनी सूत्रसंचालन केले. संभाजी बारणे यांनी आभार मानले. रिचा राजन यांनी गायलेल्या भक्तिगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ आणि पसायदानाने समारोप करण्यात आला.

# शेकडो दिव्यांग बांधवांनी घेतली मतदानाची शपथ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - “आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून,याद्वारे प्रतिज्ञा करतो की,आम्ही आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती आणि शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता, किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू,” अशी शपथ दिव्यांग बांधवांनी अतिरिक्त आयुक्त तथा स्वीप व्यवस्थापन प्रमुख तृप्ती सांडभोर यांच्या उपस्थितीत घेऊन येत्या महानगरपालिका निवडणुकीत १०० टक्के मतदान करण्याचा निर्धार केला.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त समाज विकास विभागाच्या दिव्यांग भवन फाऊंडेशनच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शेकडो दिव्यांग बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत मतदानाची शपथ घेतली,शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांच्या अधिपत्याखाली स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे,या उपक्रमांतर्गत दिव्यांग बांधवांना मतदानाची शपथ देण्यात आली.या कार्यक्रमास यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख, महानगरपालिकेच्या उप आयुक्त ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, दत्तात्रय भोसले, राजेंद्र वाघचौरे, सोनाली नवांगुळ, डॉ. विना तारकुंडे, डाॅ.वीणा त्रिपाठी,संगीता जोशी,ब्रॅन्ड ॲम्बेसिडर अक्षय सरोदे यांच्यासह शहरातील दिव्यांग बांधव, त्यांचे पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दिव्यांग नागरिकांचा मतदानातील सहभाग वाढावा, तसेच मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. दिव्यांग मतदारांना सक्षमपणे मतदान करता यावे, यासाठी महापालिकेकडून अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# कोयत्याने वार करुन चार लाखांची रोकड लंपास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : दुकानासमोर उभ्या असलेल्या एका व्यक्तीवर चौघांनी कोयत्याने वार करून तीन लाख ८० हजार रोख असलेली बॅग हिसकावून पळून गेले. त्यातील तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना मंगळवारी केशवनगर, चिंचवड येथे घडली.याप्रकरणी आशिष अरजनभाई बुवा (वय ३४, रा. केशवनगर, चिंचवड) यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार यश रमेश अंधारे (वय १९, रा. थेरगाव), रितेश मुकेश चव्हाण (वय १९, रा. थेरगाव), रुपेंद्र रुपबसंत बैद (वय १९, रा. पिंपरी) यांना अटक करण्यात आली आहे.**




त्यांच्यासह चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्याद हे त्यांच्या मालकाच्या दुकानासमोर थांबले होते. त्यावेळी आरोपी तेथे आले. त्यांच्या हातातील कोयत्यासारख्या धारदार हत्याराने फिर्यादी यांच्यावर वार करून त्यांना जखमी केले. तसेच त्यांच्या ताब्यातील तीन लाख ८० हजार रुपये असलेली बॅग जबरदस्तीने हिसकावून नेली. जाताना आरोपींनी घटनास्थळी हत्याराने दहशत माजवून लोकांना धमकावत पळून गेले. चिंचवड पोलीस तपास करत आहेत.टेम्पो चालकाने हलगर्जीपणाने दरवाजा उघडा ठेवला. त्यावेळी मागून आलेला दुचाकीस्वार दरवाजाला धडकून खाली पडला आणि त्याच्या अंगावरून ट्रक गेल्याने त्याचा मृत्यू झाला.

ही घटना मंगळवारी त्रिवणीनगर चौक, निगडी येथे घडली. याप्रकरणी जलील सलीम तांबोळी (वय ४२, रा. ओटास्किम, निगडी) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. टेम्पो चालक निलेश ग्यानुजी प्रधान (वय ३२, रा. ओटास्किम, निगडी) आणि ट्रक चालक बाळासाहेब शंकरराव घोडके (वय ४५, रा. टॉवरलाईन चौक) यांना अटक करण्यात आली आहे. जैद तांबोळी (वय १९) असे या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

# नागरिकांशी भाजपाचा प्रत्यक्ष संवाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना अपेक्षित विकासकामांसाठी किंवा सुधारणांसाठी नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधा आणि योग्य सूचना संकलित करून लोककेंद्रीत जाहीरनामा तयार करा. भाजपा सत्ताकाळात केलेली विकासकामे आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प घराघरात पोहोचतील, असे नियोजन करा, अशा सूचना राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शहरातील पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.**



पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व लोकप्रतिनिधी, माजी खासदार, आमदार आणि प्रमुख पदाधिकारी यांची राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतपाटील यांनी आढावा बैठक घेतली.यावेळी प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडे, माजी शहराध्यक्ष सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रदेश संयोजक राजेश पिल्ले, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी महापौर नितीन काळजे, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव, महिला शहराध्यक्ष सुजाता पालांडे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष चेतन भुजबळ, अनुसूचित जाती मोर्चा शहराध्यक्ष अनिल घोलप, मंडलाध्यक्ष गणेश ढोरे, शिवराज लांडगे, मंगेश धाडगे, जयदीप खापरे, धरम वाघमारे, अजित बुर्डे, रामदास कुटे, अमोल डोळस, सोमनाथ तापकीर, मोहन राऊत, हर्षद नढे, अनिता वाळुंजकर पदाधिकारी उपस्थित होते.चंद्रकांत पाटील यांनी बैठकी दरम्यान शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांना निवडणूक इच्छुकांसाठी अर्ज वितरणाची कार्यवाही सुरू करण्यास सांगितले. त्यांनी निर्देश दिले की, आगामी ५ दिवसांत इच्छुक उमेदवारांचे अर्ज भरुन घेणे आवश्यक आहे आणि सदरचे अर्ज पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयातून वितरीत केले जावेत. अर्जांचा स्वीकार स्वतः शहराध्यक्ष करणार आहेत. त्याचबरोबर, प्रत्येक प्रभागनिहाय किमान ५ हजार घरांमध्ये पक्षाचा जाहीरनामा पोहोचवणे आणि संपूर्ण शहरातील किमान ५० हजार नागरिकांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन भाजपच्या सत्ताकाळात झालेल्या विकासकामांची तसेच राज्य व केंद्र सरकारच्या प्रकल्पांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असे पाटील यांनी स्पष्ट केले.दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील ३२ प्रभागांमध्ये प्रभागनिहाय बैठका घेण्यात येणार आहेत. या बैठका उमेदवारांची क्षमता तपासण्यासाठी तसेच बूथ रचना, शक्तिकेंद्र रचना आणि कार्यप्रणाली यांचा आढावा घेण्यासाठी आयोजित केल्या जातील, अशी भूमिका शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी मांडली.

> “आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रत्येक प्रभागातील नागरिकांपर्यंत भाजपच्या विकासकामांची माहिती पोहोचवणे आणि नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेणे ही आमची प्राथमिकता आहे. यासाठी अर्ज, प्रभागनिहाय बैठक आणि जनसंपर्क या सर्व गोष्टी वेळेत आणि प्रभावी पद्धतीने राबवल्या पाहिजेत, अशा सूचना पदाधिकारी, पक्षाचे लोकप्रतिनिधी यांना दिल्या आहेत.”
>
> **चंद्रकांत पाटील,** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.

> “महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम्ही प्रत्येक प्रभागात बैठक घेऊन उमेदवारांची क्षमता तपासणार आहोत. यामध्ये बूथ रचना, शक्तिकेंद्र रचना आणि कार्यप्रणाली यांचा सखोल आढावा घेण्यात येईल. शहरातील ३२ प्रभागांमध्ये बैठकांचे नियोजन आहे. “अबकी बार 100 पार” असा आमचा निर्धार आहे.”
>
> **शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘कुष्ठरोग शोध मोहीम’ यशस्वीरीत्या संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागातर्फे दि. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत 'कुष्ठरोग शोध मोहिम' प्रभावीपणे राबविण्यात आली. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या अधिपथ्याखाली पार पडलेल्या या संपूर्ण मोहिमेचा उद्देश शहरातील नागरिकांमध्ये कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे, रुग्णांचे निदान करणे तसेच वेळेवर उपचार उपलब्ध करून देणे हा होता.**



वैद्यकीय विभागाच्या पथकामार्फत संपूर्ण शहरातील विविध वसाहती, झोपडपट्ट्या, घनदाट लोकवस्ती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल क्षेत्रे तसेच संवेदनशील भागांमध्ये गृहभेटीद्वारे नागरिकांची तपासणी करण्यात आली. मोहिमेदरम्यान पथकाने त्वचेवरील डाग, संवेदना कमी होणे, मुंग्या येणे, सूज, किंवा कुष्ठरोगाची कोणतीही संभाव्य लक्षणे असलेल्या नागरिकांचे बारकाईने परीक्षण केले. संशयित रुग्णांना तत्काळ प्राथमिक औषधोपचार देण्यात आले व पुढील मार्गदर्शन करण्यात आले.महानगरपालिकेच्या या व्यापक मोहिमेमुळे शहरात कुष्ठरोगाविषयी जनजागृती वाढली असून लक्षणे असलेल्या अनेक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने तपासणी केली. वैद्यकीय विभागातर्फे मोहिमेदरम्यान समुपदेशन, उपचार, मार्गदर्शन आणि फॉलो-अप यावरही विशेष भर देण्यात आला. शहराच्या आरोग्य रक्षणासाठी महानगरपालिका सतत प्रयत्नशील असून अशा उपक्रमांना नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.वैद्यकीय पथकातर्फे शहरभर गृहभेटी, तपासण्या आणि जनजागृतीसदर मोहिमेसाठी वैद्यकीय विभागाच्या वतीने एकूण २१२ जनांचे पथक तैनात करण्यात आले होते, ज्यामध्ये तज्ञ डॉक्टर, सूपरवायजर व प्रशिक्षित आशा स्वयंसेविका तसेच परूष स्वयंसेवकांचा समावेश होता. सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे यांच्या मार्गदर्शनाखाली या पथकाने एकूण ७९,१७७ घरांना प्रत्यक्ष भेटी दिल्या व सुमारे ३,६१,८५४ व्यक्तींची तपासणी करण्यात आली. सर्वेक्षणादरम्यान ११ रुग्णांना कुष्ठरोग असल्याचे निदान झाले. संशयित रुग्णांना तत्काळ प्राथमिक औषधोपचार देण्यात आले व पुढील मार्गदर्शन करण्यात आले.“कुष्ठरोग नियंत्रणासाठी लवकर निदान आणि तात्काळ उपचार हा सर्वात प्रभावी मार्ग आहे. महानगरपालिकेच्या वैद्यकीय पथकांनी या मोहिमेदरम्यान ज्या शिस्तबद्ध पद्धतीने सर्वेक्षण करून नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवल्या, त्याचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. महानगरपालिका नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजा ओळखून अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देत राहील.”- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

METRO CITY ICON AWARD 2025

सस्नेह निमंत्रण

# मेट्रो सिटी
## आयकॉन अवॉर्ड २०२५

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

# पुरस्कार सोहळा २०२५



**मा.रोहिणी ताई खडसे**
महिला प्रदेशाध्यक्ष
राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

## शुभहस्ते



**मा.श्रीरंग आप्पा बारणे**
खासदार, मावळ लोकसभा

### प्रमुख उपस्तिथी

**मा.श्री.इरफानभाई सय्यद**
शिवसेना उपनेते

**मा.शैलजा ताई मोरे**
मा.उपमहापौर पि.चिं.मनपा

**मा.प्रियांका ताई बारसे**
मा.नगरसेविका पि.चिं.मनपा

**मा.सरिता ताई साने**
संघटिका : पिं.चिं.शहर शिवसेना

**मा.श्री.संतोष बारणे**
प्रसिद्ध उद्योजक, पिंपरी चिंचवड

**मा.श्री.पैगंबर शेख**
सामाजिक कार्यकर्ते

**विशेष सन्मान | जेष्ठ नागरिक सन्मान | महिला बचत गट सन्मान**

दिनांक 07 डिसेंबर 2025 | वेळ सकाळी 11:00 वा.

स्थळ : ग.दि. माडगूळकर नाट्यगृह (मिनी ऑडिटेरियम) आकुर्डी पिं.चिं.शहर

आयोजक

## शबनम न्यूज मिडिया ग्रुप

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स